# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.
ई-मेल: mercindia@mercindia.org.in संकेत स्थळ www.mercindia.org.in

,

## जाहीर सूचना

**महावितरणच्या भार नियमनाबाबतच्या परिपत्रक क्र. ४३ व ४४ बाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने स्वत: सुरु केलेल्या सुनावणीच्या दरम्यान, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने "महाराष्ट्र भार-नियमन मुक्त करण्यासाठी, सादर केलेल्या कालबध्द कार्यक्रमावर" सूचना मागविण्याकरिता**

**आयोगाचे सन २०१२ चे प्रकरण क्र. ४१**

पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे (मराविमं) वीज वितरणाचे कार्य सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) करीत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) भार-नियमनाची तत्त्वे व कार्यपध्दतीचे आदेश वेळोवेळी दिले आहेत.

२. महावितरण कंपनीने भार-नियमनाबाबत निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. ४३ व ४४ संबंधीच्या सन २०१२ च्या प्रकरण क्र. ४१ मध्ये दि. १६ मे, २०१२ आणि दिनांक २२ जून, २०१२ रोजी आयोगाने स्वत:हून सुनावणी अयोजित केली होती.

३. सदर सन २०१२ च्या प्रकरण क्र. ४१ च्या सुनावणीच्या वेळी, महावितरण कंपनीला, आयोगाने, **"महाराष्ट्र भार-नियमन मुक्त करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम "**सादर करण्याचे निर्देश दिले होते. वीज दराबाबतच्या सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ बाबत दि. ११ जुलै, २०१२ ते दि. २७ जुलै, २०१२ या कालावधीत महाराष्ट्रातील सहा महसुली विभागांच्या मुख्यालयांमध्ये जाहीर सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. या सुनावणीमध्ये, कालबध्द कार्यक्रमावर जनतेची मते मागविण्यासाठी, सदर कालबध्द कार्यक्रम प्रदेश-विशिष्ट माहितीसह सादर करण्याचे देखील महावितरण कंपनीला निर्देश देण्यात आले होते.

४. त्यानंतर, महावितरण कंपनीने त्यांच्या दि. २१ जून, २०१२ च्या पत्राने सदर **"महाराष्ट्र भार-नियमन मुक्त करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम "** सादर केला आहे. या कालबध्द कार्यक्रमाची प्रत आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

५.	उपरोक्त संकेत-स्थळावरुन **“महाराष्ट्र भार-नियमन मुक्त करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम”** उतरवून घेऊन इच्छुक व्यक्तींनी त्यांची मते, सूचना आणि /किंवा हरकती आयोगाला खालील पत्त्यावर कृपया पाठवाव्यात:-

सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३वा मजला, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

वरीलप्रमाणे मते, सूचना आणि /किंवा हरकती आयोगाकडे २८ जुलै, २०१२ रोजी किंवा त्यापूर्वी लेखी सादर करण्यात याव्यात किंवा महाराष्ट्राच्या सहा महसुली विभागांच्या मुख्यालयात खालीलप्रमाणे, सन २०१२च्या प्रकरण क्र. १९ मध्ये, घेण्यात येणा-या जाहीर सुनावणींच्या वेळी मांडाव्यात -

| **अ. क.** | **जाहीर सुनावणीची जागा/ठिकाण** | **वेळ** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| १. | **अमरावती**<br>हॉल क्र.१, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कॅम्प परिसर, अमरावती, जिल्हा- अमरावती | **१०.०० वाजता** | **बुधवार, दि. ११ जुलै, २०१२** |
| २. | **नागपूर**<br>वानामती हॉल, व्ही. आय पी. मार्ग, धरम पेठ, नागपूर, जिल्हा-नागपूर | **१०.०० वाजता** | **शुक्रवार, दि. १३ जुलै, २०१२** |
| ३. | **औरंगाबाद**<br>मिटींग हॉल, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा-औरंगाबाद | **१०.०० वाजता** | **गुरुवार, दि. १९ जुलै, २०१२** |
| ४. | **नाशिक**<br>नियोजन भवन, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जुना आग्रा मार्ग, नाशिक | **१०.०० वाजता** | **सोमवार, दि. २३ जुलै, २०१२** |
| ५. | **पुणे**<br>कौन्सिल हॉल, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, पुणे, जिल्हा-पुणे | **१०.०० वाजता** | **बुधवार, दि. २५ जुलै, २०१२** |
| ६. | **नवी मुंबई**<br>कॉन्फरन्स हॉल, ७ वा मजला, सिडको भवन, सी बी डी, बेलापूर, नवी मुंबई | **१०.०० वाजता** | **शुक्रवार, दि. २७ जुलै, २०१२** |

उपरोक्त लेखी मते, सूचना आणि /किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत त्या पाठविणा-याचे संपूर्ण नांव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, इ-मेलच्या पत्त्यासह, सादर कराव्यात. त्यांची एक प्रत मुख्य अभियंता (भार व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१, यांना पाठविण्यात यावी. या सूचना किंवा हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा विशिष्ट ग्राहक वर्गवारीच्या वतीने सादर करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे.

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई,**
**दि. २९ जून, २०१२**